|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

## संलग्नता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/५/संलग्नीता **महा.प्रस्ताव-२०२७-२८/१८५/२०२६** **दिनांक :१४/०८/२०२६**

**अत्यंत महत्वाचे व कालमर्यादित**

# परिपत्रक (संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकरिता)

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या**
**सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक....**
**तसेच खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थांचे मा.संचालक ........**

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ करीता **संलग्नीकरणाचे नुतनीकरण/तुकडी नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार** तसेच **कायम संलग्नीकरण** इत्यादिंचे प्रस्ताव/अर्ज माहे ***ऑगष्ट*** मध्ये सादर करणेबाबत...

संदर्भ :- ०१) मा. विद्या परिषदेचा ठराव क्र. ए-६७/२०१९, दि. २५/०५/२०१९
०२) विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/५/३६५दि.०६/०१/२०२६
०३) मा.विद्या परिषद ठराव क्र. वि.प.ए.९७/२०२५ दि. १७/१२/२०२५

**महोदय/महोदया,**

मा. विद्या परिषदेच्या वरील संदर्भिय ठरावानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार/कायम संलग्नीकरणाचे प्रस्ताव ***माहे सप्टेंबर ऐवजी ऑगस्ट मध्ये स्वीकारण्याबाबत*** मा.विद्या परिषदेने ठराव क्र. ए-६७/२०१९, दि. २५/०५/२०१९ नुसार ठराव पारीत केलेला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ चे कलम १०७, १०८, १०९, ११०, १११, ११२, ११३,११४ व ११६ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये सध्या सुरु असलेल्या विविध अभ्यासक्रमांचे **संलग्नीकरणाचे नूतनीकरण, महाविद्यालयात सुरु असलेल्या तुकडीच्या संलग्नीकरणाचे नूतनीकरण तसेच नैसर्गिक विस्तार आणि कायम संलग्नीकरण** इत्यादिंसाठी प्रस्ताव/अर्ज मागविण्यांत येत आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या तरतुदींनुसार प्राप्त प्रस्तावांवर विद्यापीठाव्दारे प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

या शैक्षणिक वर्षापासून संलग्नता संलग्नीकरणासाठी स्वीकारण्यात येणारे शुल्क हे ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येणार असून, या संदर्भात अधिक माहितीसाठी परिपत्रकात नमूद ***ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज सादर करणेसाठी आवश्यक त्या सूचना व माहिती*** या शिर्षकात ऑनलाईन पध्दतीने शुल्क कसे अदा करावे याबाबत सविस्तर माहिती नमूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रस्ताव व प्रस्तावासाठी आवश्यक शुल्काचा तक्ता भरण्यात यावा. त्यानंतर विद्यापीठाकडून शुल्काचा तक्ता तपासणी केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीनेच संलग्नता शुल्क स्वीकारण्यात येणार आहे. याची नोंद घ्यावी.

**उपरोक्त संदर्भात आपणांस कळविण्यात येते की:-**

१) सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी तसेच खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्था यांनी विषयांकीत प्रस्ताव/अर्ज भरणेपूर्वी प्रथम आपल्या महाविद्यालयाची/मान्यताप्राप्त परिसंस्थेची Academic information आणि Teachers' information ऑनलाईन प्रणालीमार्फत काळजीपूर्वक अद्ययावत (Update) करुन submit करावी व Send करावी, त्याशिवाय आपणांस शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करिता कोणत्याही प्रस्तावाचे ऑनलाईन अर्ज भरता येणार नाहीत याची दखल घेऊन कृपया सदर माहिती व्यवस्थितरित्या अद्ययावत (Update) करुन ती ऑनलाईन प्रणालीव्दारे Send करावी. (कृपया विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या संदर्भिय पत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन करुन आपणांस उपलब्ध

..२..

असलेल्या प्रत्येक लिंकमधील **[College Information पासून Teaching Staff पावेतोच्या]** माहिती परिपूर्ण स्वरुपात अद्ययावत करावी.) ऑनलाईन प्रणालीव्दारे माहिती अद्ययावत करतांना **आपण यापूर्वी नोंदणी केलेला मोबाईल क्रमांक जर बदलला असेल, तर त्यासंदर्भातील बदल करणे आवश्यक आहे. असा बदल न केल्यास आपणांस ऑनलाईन प्रणालीव्दारे कोणताही मेसेज प्राप्त होणार नाही, व त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल, याची कृपया नोंद घेऊन सदर बाब आपल्या महाविद्यालयातील संबंधित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांनादेखील अवगत करण्यांत यावी.**

२) मुद्दा क्र.०१ मध्ये नमूद केलेली महाविद्यालयाची माहिती तसेच शिक्षकांची माहिती अद्ययावत करणेकरिता आवश्यक असणा-या **दोन्ही links ह्या दि.२९/०८/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपावेतो सुरु राहतील,** याची कृपया नोंद घ्यावी. महाविद्यालयाने Academic Information या Link मधील माहिती तसेच आपणांस लागू असलेल्या प्रस्तावाची प्रस्तावाची माहिती अत्यंत काळजीपूर्वक भरणे आवश्यक असून, भरण्यांत आलेल्या माहितीची आपल्या स्तरावर प्रिंट घेऊन त्याची खातरजमा करावी. तद्नंतरच सदरची माहिती Submit करुन Send to University करावी.

विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, ब-याचदा भरलेल्या माहितीची खातरजमा न करता अपूर्ण भरलेली/अद्ययावत न केलेली माहिती ऑनलाईन प्रणालीमार्फत Submit करुन Send to University करण्यांत येते. त्यामुळे वेळोवेळी सदरची माहिती पुन:श्च भरणेसाठी/अद्ययावत करणेसाठी Academic Information / Proposal Link, **Unlock** करावी लागते. त्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होतात, अपूर्ण भरलेल्या माहितीची हार्ड कॉपी सादर करण्यांत येते, तथापि, unlock केल्यानंतरची सुधारित माहिती ऑनलाईन प्रणालीमार्फत Send to University केली जात नाही व सुधारीत हार्ड प्रत सादर करण्यांत येत नाही, त्यामुळे संभ्रम निर्माण होतो. तरी याबाबत भरलेल्या/अद्ययावत केलेल्या माहितीची खातरजमा करुनच त्याबाबत पुढील कार्यवाही करावी. अन्यथा, ज्या-त्या स्टेजला पुन:श्च unlock करुन ऑनलाईन प्रणालीव्दारे भरलेल्या माहितीत सुधारणा/दुरुस्ती करणेसाठी ***रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे)*** मात्र इतकी रक्कम दंडाच्या स्वरुपात आकारण्यांत येईल, याचीही कृपया नोंद घ्यावी.

३) विद्यापीठाच्या परिपत्रक क्र.उमवि/५/६७९/२०१२, दिनांक ०१.१०.२०१२ मध्ये नमूद केलेल्या तक्त्यातील रकान्यांप्रमाणे आपणांस लागू असलेले Application Fee आणि Online Profile Fee (प्रक्रिया शुल्क) भरणे आवश्यक आहे.

तथापि,या ***संदर्भात नमूद करण्यात येते की, प्रस्ताव ऑनलाईन भरणेबाबतची लिंक सुरु करण्यासाठीचे प्रक्रिया शुल्क हे प्रस्तावा सोबतच जमा करणे आवश्यक आहे. सदरचे शुल्क हे स्वतंत्रपणे भरण्याची आवश्यकता नाही, त्याकरीता विद्यापीठात महाविद्यालयांनी/परिसंस्था यांनी कोणतेही प्रतिनिधी पाठवू नयेत, याची कृपया नोंद घ्यावी.***

४) महाविद्यालयात सुरु असलेल्या ज्या अभ्यासक्रमांची संलग्नता शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पर्यंतच असेल अशा अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ साठी **संलग्नीकरणाचे नुतनीकरण** करुन घेणे आवश्यक आहे. **संलग्नीकरणाच्या नूतनीकरणाचे** विहीत नुमन्यातील अर्ज विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने भरुन त्याची प्रिंट घेऊन सदर अर्जाची **एक प्रत** आवश्यक ते साक्षांकीत केलेले कागदपत्र, मागील शैक्षणिक वर्षातील संलग्नता शुल्क भरल्याच्या पावतीसह, Applications शुल्क प्रक्रिया शुल्क व आवश्यक त्या संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावी.

सर्व महाविद्यालये/परिसंस्था यांनी वरील विषयांकित प्रस्तावांकरीता मिनी बॉक्स फाईलचा वापर करावा अन्यथा प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. तसेच संपूर्ण फाईल्सच्या दस्तऐवजांना अनुक्रमांक देवून नमूद केलेल्या सूचीमध्ये परिपूर्ण स्वरुपात भरुन सादर करणे आवश्यक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

५) तसेच संदर्भ क्र. २ नुसार संलग्नता शुल्कात वाढ करण्यात आलेली आहे. संलग्नता **शुल्काबाबतचे परिपत्रक, संलग्नता शुल्काचा तक्ता आदि माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून, नविन अभ्यासक्रमांच्या संलग्नता शुल्कासंदर्भात यापूर्वी वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. सदर बाब विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच ऑनलाईन ॲफिलिएशन (OAASIS) मधील** ***Downloads या link वर उपलब्ध आहे.***

..३..

६) ज्या महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये शासनाने दिलेल्या परवानगी व विद्यापीठाने दिलेल्या मान्यतेने नवीन विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम / नवीन विषय सुरु झाले असतील, त्यांनी त्या अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ मध्ये त्या विद्याशाखा/नवीन अभ्यासक्रम/नवीन विषयासाठी **नैसर्गिक विस्ताराचा अर्ज** स्वतंत्रपणे ऑनलाईन प्रणालीव्दारे भरावयाचा असून ऑनलाईन पध्दतीने माहिती भरल्यानंतर त्याची प्रिंट घेऊन त्यासोबत आवश्यक ते साक्षांकीत केलेले कागदपत्र, प्रक्रिया शुल्क व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात **०१ प्रतीत** सादर करावेत.

७) नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP २०२०) पदवी अभ्यासक्रम हा चार वर्षाचा करण्यात आलेला आहे. त्यामुळे तीन वर्षे झाल्यानंतर चौथ्या वर्षीसाठी नुतनीकरणाचा प्रस्ताव सादर करावा.

**अत्यंत महत्वाचे**

उदा. (i) शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये कला विद्याशाखेत बी.ए. अभ्यासक्रम सुरु झाला असेल तर शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ मध्ये प्रथम वर्ष कला वर्गाच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव, व्दितीय वर्ष कला वर्गाच्या सामान्य तसेच विशेष (Special) स्तरावरील विषयांसाठी नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव, सादर करावेत व शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये प्रथम व द्वितीय वर्ष नुतनीकरणाचा प्रस्ताव आणि तृतीय वर्ष कला वर्गाच्या सामान्य आणि विशेष स्तरावरील विषयांच्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव/अर्ज सादर करावा.

उदा. (ii) शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये विज्ञान विद्याशाखेतील बी.एस्सी. अभ्यासक्रम सुरु झाला असेल तर शैक्षणिक वर्ष २०२७-२८ मध्ये प्रथम वर्षाच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव, व्दितीय वर्ष विज्ञान वर्गाच्या सामान्य स्तरावरील विषयांसाठी नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये प्रथम व द्वितीय वर्षाच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव आणि शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करीता तृतीय वर्ष विज्ञान वर्गाच्या विशेष स्तरावरील विषयांचा नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव सादर करावे.

८) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ११६ मध्ये तसेच विद्यापीठ अध्यादेश ८८ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार ज्या महाविद्यालयांना पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विषय व तुकडयांना **स्थायी/कायम संलग्नीकरणासाठी** अर्ज करावयाचे असतील, अशा महाविद्यालयांनी विहीत नुमन्यातील अर्जात विषय व तुकडयांचा उल्लेख Intake Capacity सह करुन सदर अर्ज विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने भरुन त्याची प्रिंट घेऊन सदर अर्जाची **एक प्रत** आवश्यक ते साक्षांकीत केलेले कागदपत्र, प्रक्रिया शुल्क व संलग्नता शुल्कासह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात सादर करावी. सदरचे अर्ज सादर करतांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या यु.जी.सी. रेग्युलेशन, २००९ तसेच त्यात झालेल्या बदलाचा व निर्गमित करण्यांत आलेल्या यु.जी.सी.रेग्युलेशन अमेंडमेंट, २०१२ मधील तरतूदींचे अवलोकन करावे. सदर रेग्युलेशनमध्ये नमूद केलेले निकष महाविद्यालय पूर्ण करीत असेल तरच अर्ज करावा, अन्यथा असे अर्ज करु नयेत, याची कृपया नोंद घ्यावी.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११६ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीच्या अनुषंगाने **कायम संलग्नीकरणासाठी कमीतकमी पाचवर्षे संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था मान्यतेसाठी अर्ज करतील. तसेच नॅक मानांकन झालेले असणे आवश्यक असून महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडून २(F) प्रमाणपत्र प्राप्त झालेले असणे आवश्यक असून बंधनकारक आहे.**

९) **ज्या महाविद्यालयांना/परिसंस्था यांना यापूर्वी कायम/स्थायी संलग्नीकरण प्राप्त झालेले आहे त्यांनी प्रत्येक वर्षी वार्षिक संलग्नता शुल्क भरणे आवश्यक राहील.**

१०) **कायम संलग्नीकरणासाठी अर्ज केलेल्या महाविद्यालय/परिसंस्था यांनी त्या त्या विषयांचा नुतनीकरणाचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. याची कृपया नोंद घ्यावी.**

नूतनीकरण/ नैसर्गिक विस्तार/ तुकडी नूतनीकरण तसेच कायम संलग्नीकरण या अर्जांच्या प्रकारानुसार अर्ज सादर करावयाचे आहेत. तथापि, **महाविद्यालयांनी सादर केलेले अर्ज तपासून जमा करुन घेणे, यासाठी घाई होऊन अर्जात अपूर्णता अथवा त्रुटी राहू शकतील आणि आपल्या अर्जांवर योग्यरितीने कार्यवाही होणार नाही, तसेच आवश्यक ती माहिती शासनाकडे पाठविणे अडचणीचे होईल.** सबब, सदरच्या अडचणी निर्माण होऊ

नयेत यासाठी नूतनीकरण/तुकडी नूतनीकरण, कायम संलग्नीकरण आणि नैसर्गिक विस्ताराच्या परिपूर्ण अर्जांची **हार्ड कॉपी सादर करण्यासाठी संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांकरिता माहे ऑगष्ट मध्ये स्विकारण्यात येणाऱ्या प्रस्तावांसाठी पुढीलप्रमाणे जिल्हा/ तालुकानिहाय वेळापत्रक तयार करण्यांत आले आहे.**

**११) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ११२ नुसार मान्यता प्रदान केलेल्या खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थांनी सुध्दा वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

*** वेळापत्रक ***

| अ.क्र. | दिनांक व वार | विद्याशाखा | जिल्हा | तालुका |
|---|---|---|---|---|
| ०१ | शनिवार २२/०८/२०२६ | शिक्षणशास्त्र | धुळे व नंदुरबार | सर्व तालुके |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान | नंदुरबार | अक्कलकुवा, धडगांव, नंदुरबार. |
| | | | जळगांव | अमळनेर, पारोळा, एरंडोल, धरणगांव, भडगांव. |
| ०२ | सोमवार २४/०८/२०२६ | औषधनिर्माणशास्त्र | जळगांव, धुळे व नंदुरबार | सर्व तालुके |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान | धुळे | धुळे. |
| | | | जळगांव | जळगांव, भुसावळ. |
| ०३ | मंगळवार २५/०८/२०२६ | कला, वाणिज्य व विज्ञान | धुळे | साक्री, शिंदखेडा, शिरपूर. |
| | | | जळगांव | बोदवड, जामनेर, मुक्ताईनगर, रावेर, यावल. |
| ०४ | गुरुवार २७/०८/२०२६ | शिक्षणशास्त्र | जळगांव | सर्व तालुके |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान | नंदुरबार | नवापूर, शहादा, तळोदा. |
| | | | जळगांव | चाळीसगांव, चोपडा, पाचोरा. |
| ०५ | शनिवार २९/०८/२०२६ | अभियांत्रिकी | जळगांव, धुळे व नंदुरबार | सर्व तालुके |
| | | विधी, समाजकार्य, ललितकला | जळगांव, धुळे व नंदुरबार | सर्व तालुके |
| | | मान्यताप्राप्त परिसंस्था | धुळे व नंदुरबार | सर्व तालुके |
| | | मान्यताप्राप्त परिसंस्था | जळगांव | सर्व तालुके |

***तरी आपणांस विनंती करण्यात येते की, आपण आपले अर्ज ऑनलाईन प्रणालीमार्फत भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्जाची हार्ड कॉपी (सदर परिपत्रकात नमूद केलेल्या प्रतीत) संलग्नता शुल्क, ऑनलाईन ॲप्लीकेशन फी, व प्रोफाईल फीसह विद्यापीठाच्या संलग्नता विभागात उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे सादर करावी.*** आपल्या महाविद्यालयाचा/मान्यताप्राप्त परिसंस्थेचा ऑनलाईन प्रणालीमार्फत परिपूर्ण भरलेला अर्ज/प्रस्ताव, आवश्यक त्या साक्षांकीत केलेल्या कागदपत्रांसह तयार असल्यास, आपण असे अर्ज/प्रस्ताव वर नमूद केलेल्या वेळापत्रकापूर्वीदेखील सादर करु शकतात.

आपणास असेही कळविण्यात येते की, विद्यापीठाने निर्धारित केलेल्या कालावधीतच प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यात यावेत. विलंबाने प्राप्त होणारे प्रस्ताव Ordinance 172-A(5) मध्ये नमूद केल्यानुसार दंडासह शुल्क भरुन विद्यापीठास सादर करण्यात यावेत याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त नमूद केलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी विद्यापीठाच्या http://onlinekbcnmu.org.in या संकेतस्थळावर Homepage वरील Affiliation Section या Link वर click करुन **Proposal Guidelines २०२७-२८** येथे Click करावी. सदर Link मध्ये आवश्यक त्या सर्व सूचना देण्यांत आलेल्या असून त्या सूचनेनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. आपल्या माहितीसाठी सदर टिकाणी helpline देखील देण्यांत आलेली आहे. तसेच शासनाने यासंदर्भात वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय, संलग्नता शुल्काचा तक्ता, प्रक्रिया शुल्काचे परिपत्रक, वेळापत्रक व इतर सविस्तर माहिती आणि संबंधित परिपत्रके **Important G.R/Circulars** तसेच **Other G.R./Circulars** या Link वर उपलब्ध आहेत.

**ऑनलाईन प्रणालीव्दारे माहिती भरतांना वा आपणांस काही अडचणी असल्यास सदर अडचणींचे निराकरण करणेसाठी वर Contact us या Link वर helpline देण्यांत आलेली असून आपण त्या ठिकाणी देण्यांत आलेल्या दूरध्वनी/मोबाईलवर संपर्क साधल्यास तसेच support@onlinekbcnmu.org.in या मेल आयडीवर मेल केल्यास आपल्या अडचणींचे निराकरण केले जाईल.**

अर्ज सादर करण्यासाठी वर नमूद केलेल्या Link मधील सूचना तसेच या पत्रासोबत जोडलेल्या सूचनांचे अवलोकन करुन कृपया आपण आपले अर्ज सादर करावेत, ही विनंती.

**आपणांस विदीत करण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता ज्या संलग्नीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना संलग्नीकरणाचे नुतनीकरण व नैसर्गिक विस्तारास विद्यापीठाने मान्यता प्रदान केलेली आहे, अशा महाविद्यालयांनी त्यांना देण्यांत आलेल्या मान्यता पत्रात नमूद केलेल्या अटीं/त्रुटींबाबतचा पूर्तता अहवाल आवश्यक त्या साक्षांकीत केलेल्या कागदपत्रांसह विद्यापीठाच्या संलग्नता विभागास सादर करणे आवश्यक आहे. सदरचा अटी-पूर्तता अहवाल सादर केल्याशिवाय आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेचा शैक्षणिक वर्ष २०२७-२८ करिताचा कोणताही प्रस्ताव स्विकारण्यांत येणार नाही, व त्यावर कार्यवाही करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

तरी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी, ही विनंती.

कळावे,

(डॉ.विनोद पी.पाटील)
कुलसचिव

**सोबत : अर्ज सादर करणेसाठी आवश्यक त्या सूचना व माहिती.**

कृपया प्रस्ताव सादर करतेवेळी महाविद्यालय/परिसंस्थेचे एकच प्रतिनिधी (संलग्नता प्रस्तावाची प्रक्रिया माहिती असलेला) विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित रहाणे अनिवार्य राहील.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी:-**
मा.वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगाव

**प्रत माहितीसाठी:-**
०१) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०३) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०४) संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव

## ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज सादर करणेसाठी आवश्यक त्या सूचना व माहिती

१) Proposal Guidelines २०२७-२८ **मध्ये विविध प्रस्तावांच्या Links देण्यांत आलेल्या आहेत. आपल्या महाविद्यालयास/परिसंस्थेस ज्या करिता प्रस्ताव सादर करावयाचा आहे त्या प्रस्तावाच्या Link वर click** करावे. तसेच परिपत्रकात नमूद केलेल्या Link मधील सूचनांचे अवलोकन केल्यानंतरच अर्ज भरावा. अर्ज भरतेवेळी आवश्यक ते दस्तऐवज जवळ ठेवल्यास सदर अर्जातील माहिती भरणे सुकर होईल.

२) आपणांस लागू असलेल्या अर्जाची माहिती आपण ऑनलाईन प्रणालीव्दारे भरावी व त्याची A-४ साईज पेपरवर एकाच बाजूने प्रिंट घेऊन (परिपत्रकात नमूद केलेल्या प्रतीत) त्यासोबत आवश्यक ते साक्षांकीत केलेले कागदपत्र, सहपत्र, विहीत केलेल्या संलग्नता शुल्कासह प्रस्ताव/अर्ज वेळापत्रकाप्रमाणे सादर करावा.

३) महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था, खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थां यांनी प्रत्येक प्रस्तावाच्या स्वतंत्र फाईल्स पाठवाव्यात. उदाहरणार्थ,

(i) संलग्नीकरणाच्या नुतनीकरणासाठी/तुकडी नुतनीकरणासाठी स्वतंत्र प्रस्तावाची फाईल.
(ii) नैसर्गिक विस्तारासाठी स्वतंत्र प्रस्तावाची फाईल.
(iii) कायम संलग्नीकरणासाठी स्वतंत्र प्रस्तावाची फाईल.

ऑनलाईन प्रणालीमार्फत आपल्या Link वर उपलब्ध असलेली तपासणी सूची डाऊनलोड करुन सदर सूची प्रथम परिपूर्ण स्वरुपात भरावी. उपरोक्त प्रस्तावांच्या फाईलमध्ये (१) भरलेली तपासणी सूची, (२) प्रस्ताव अर्जाची प्रत व त्यानंतर (३) साक्षांकीत केलेले ज्या-त्या प्रस्तावांशी निगडीत कागदपत्र/सहपत्र जोडावीत.

४) ज्या महाविद्यालयांना अभ्यासक्रम आणि तुकडीच्या कायम संलग्नीकरणासाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे, त्यांनी कायम संलग्नता मान्य होईपावेतो त्या त्या वर्षासाठी संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

५) आपला अर्ज अचूक व परिपूर्णपणे सादर करण्याच्यादृष्टीने महाविद्यालयातील/परिसंस्थेतील ज्या कर्मचारी/प्रतिनिधींना अर्जाबाबत सखोल माहिती आहे, अशाच कर्मचारी/प्रतिनिधींना अर्ज सादर करतेवेळी समक्ष पाठविणे आवश्यक आहे.

६) मागील शैक्षणिक वर्षामध्ये वरील प्रकारचे अर्ज सादर केलेले नसल्यास त्याबाबत विद्यापीठास अवगत करावे.

७) मागील संलग्नता शुल्काची रक्कम बाकी असल्यास शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ च्या प्रस्ताव/अर्जासोबत येणे बाकी असलेले शुल्क Ordinance 172-A(5) मध्ये नमूद केल्याप्रमाणे दंडासह भरणे आवश्यक आहे.

८) आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत **शासनाची मान्यता नसतांना जे विषय/अभ्यासक्रम सुरु असतील, त्याबाबत विद्यापीठास अवगत करावे. तसेच ते विषय/अभ्यासक्रम प्रस्तावात नमूद करु नयेत, असे विषय प्रस्तावात नमूद केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या मा.प्राचार्यांची/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या मा.संचालकांची राहील.**

९) ऑनलाईन **प्रणालीमार्फत अर्ज/प्रस्ताव भरला म्हणजे विद्यापीठास अर्ज/प्रस्ताव सादर केला असा त्याचा अर्थ होत नाही. तर ऑनलाईन प्रणालीमार्फत परिपूर्ण स्वरुपात भरलेल्या अर्जाची प्रत आवश्यक त्या साक्षांकीत केलेल्या कागदपत्रांसह व ऑनलाईन पध्दतीने भरलेले संलग्नता शुल्काच्या पावतीसह विद्यापीठाच्या संलग्नता विभागास जमा करुन त्याची नोंद घेतल्यानंतरच अर्ज/प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे, असे समजण्यांत येईल.**

## Guidelines for Updating of College Information / Academic Information for A.Y. 2027-28

1. It is mandatory for all the colleges to update their College Information and also Academic Information as applicable for current AY 2027-28 in Online Affiliation Portal.
2. All college information submitted by the colleges will be unlocked for this updation purpose by KBCNMU.
3. All the colleges must update and online submit their College Information and Academic Information for AY 2027-28 before submission of any type of Affiliation Proposal for this year.
4. **From this academic year 2027-28 Affiliation Fees for all the types of proposals i.e. Continuation of Affiliation / Natural Growth / Permanent Affiliation will be calculated strictly in online mode only.**
5. **It is mandatory for all the colleges to make payment of Online Affiliation Fees for any proposal in the online mode only. No offline fees payment at the cash counter / Demand Draft / Cheque will be permitted.**
6. **Calculation of Affiliation Fees will be strictly based on the Academic Information updated by your college in the online affiliation portal. So the college will be solely responsible for the same.**
7. **So all the Courses / Divisions / Subjects will be available for selection for any type of the above said proposal based on the Academic information filled in by you. So be careful and check properly that you have entered academic information for all the Courses / Divisions / Subjects in the online portal.**
8. **The same Courses / Divisions / Subjects will be reflected in your various Affiliation proposals upto final stage of Recommendation letter. No requests for changes in the Courses / Divisions / Subjects will be entertained hereafter at any stage of processing of Online Affiliation Proposal till the issue of Recommendation letter to the concerned college.**
9. Steps for updation of Academic Information by Colleges for AY 2027-28 are as mentioned below :
    a. Login to Online Affiliation portal using URL : https://onlinekbcnmu.org.in/index.php
    b. Click on Affiliation Section Icon on Home Page displayed.
    c. Login to OAASIS portal using Login details provided for Online Affiliation to the concerned college.
    d. Click on College Information section.
    e. Update information filled by you in various tabs in the link College Information first as applicable and Submit.
    f. Click on the link Academic Information.
        i. Click on first link "सध्या सुरु असलेले अभ्यासक्रम "
        ii. In this link Update information of all the courses that are currently present / available in your college.
        iii. All fields are mandatory.

iv. You must update total divisions sanctioned by KBCNMU for each course properly. Based on these total divisions only your proposal for Continuation of Affiliation will be finalized for the AY 2027-28.

v. Click on the second link "अभ्यासक्रम निहाय विषय ".

vi. Kindly note this link is applicable only for the colleges who have B.A / B.Sc. courses in their curriculum. For others this link is not applicable.

vii. In this link one major field विषयाचा प्रकार has been modified to reflect whether the subject has been sanctioned to the college during First time Affiliation OR during the Extension – Additional Subject sanction.

viii. Accordingly you must update the Subject Type as General (FTA) if the said subject is sanctioned to your college during First Time Affiliation of the said course.

ix. If the subject has been sanctioned to your college during Extension – Additional Subject then select Subject type as General – Extension.

x. It is mandatory that you must update this field value for every subject for all the years. Kindly note depending upon the Subject Type your fees for any type of Affiliation Proposal – Continuation of Affiliation / Natural Growth / Permanent Affiliation will be calculated online.

xi. Do not leave any subject for any year which is currently available in your college as it will not be made available to you later for selection in the proposal.

xii. Click on the third link "अभ्यासक्रम निहाय तुकड्या ".

xiii. In this link you have to update coursewise yearwise total divisions available for all the courses available in your college. Do not miss any course / year to be defined in this link.

xiv. Bases on the information entered in this division link courses / divisions will be available for selection in any type of affiliation proposal.

xv. In the table mentioned below after adding the course / year record click on Add batch details link and update complete information for all the divisions of the said course / year.

xvi. In the next screen it is mandatory to mention type of Division values as :

1. Original Division (if division sanctioned during first time affiliation of the said course)
2. Additional Division (if division is sanctioned by Extension – Additional Division Proposal)
3. Additional Fast Track Division (if division is sanctioned by Extension – Additional Fast Track Division Proposal)

g. In the next links you may update Regular Teaching Staff information.

h. Finally click on Submit to University link to send and confirm the entire College Information / Academic Information / Teaching Staff Information to KBCNMU online.
i. Once you click on this link your information will get locked and View/Print option will be activated to view/print the information submitted by you.
j. Do take print out of this information and submit the same to the KBCNMU along with your Affiliation Proposal.

10. Kindly note no links for any type of Affiliation Proposal will be activated until you update your complete College & Academic Information properly in your College Information section.

तरी संबंधित महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी उपरोक्त नमूद केलेल्या सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करुन त्यानुसार अर्ज तयार करुन सादर करावेत, अन्यथा कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

(डॉ.विनोद पी.पाटील)
कुलसचिव

**ठिकाण :-** जळगाव
**दिनांक :-** १४/०८/२०२६